# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल केलेली तक्रार क्र.रामाआ नाशिक/तक्रार क्र.४०३/२०२३/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी |
|---|---|
| श्री.योगेश चिंतामण जगताप,<br>रा.रमाई आंबेडकर कॉलनी,<br>मु.पो.शिंदे, ता.जि.नाशिक. | सहाय्यक प्रशासन अधिकारी,<br>महिला व बालविकास विभाग,<br>जिल्हा परिषद, नाशिक ता.जि.नाशिक. |

## विवेचन

तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रार क्र.४०३/२०२३/नाशिक संदर्भात दि.०९/०६/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीत आयोगाने पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत.

"तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांनी तक्रारदार यांच्या दि.०८/०३/२०२३ च्या माहिती अर्जास अनुसरुन कोणतीही कार्यवाही केलेली नाही. तसेच प्रथम अपिल निर्णयानुसार देखील तक्रारदारास माहिती दिलेली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी १५ दिवसांत आयोगास सादर करावा. त्यांचा लेखी खुलासा विहित मुदतीत आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी."

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

२. आयोगाच्या उपरोक्त आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद, नाशिक श्री.संजय सोनवणे यांनी आयोगाकडे दि.२५/१२/२०२५ अन्वये लेखी खुलासा सादर केला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, माझा अपघात झाल्याने दि.०१/१२/२०२५ ते दि.२१/१२/२०२५ पावेतो वैद्यकीय रजेवर होतो त्यामुळे उशिरा खुलासा सादर करीत आहे. तक्रारदार यांनी दि.३१/०३/२०२३ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना तक्रार अर्ज सादर केलेला होता. त्या अनुषंगाने दि.०८/०३/२०२३ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांना माहितीचा अर्ज सादर केला होता. सदरचे माहिती अर्जात दि.३१/०३/२०२३ रोजी तक्रारदाराने सादर केलेला तक्रार अर्ज यासंबंधी कोणती कार्यवाही केली या संबंधित माहितीची विचारणा केली होती. परंतू त्या माहिती अर्जास माझेकडून माहिती दिली गेली नाही त्याचे कारण असे की, जिल्हा परिषद भरती प्रक्रीया सुरु असल्याने व त्यामध्ये माझेवर काही प्रमाणात जबाबदारी निश्चित करण्यात आलेली होती तसेच कार्यालयातील न्यायालयीन कामासंदर्भातील जबाबदार माझेकडे आहे. त्या कारणाने माझे मुंबई उच्च न्यायालयात जाणे येणे चालू असते. त्यामुळे कामाचा अतिजास्त व वाढता ताण यामुळे माझेकडून उक्त माहिती अर्जास उत्तर देण्याचे अनावधनाने राहून गेले. तक्रारदाराने दि.२७/०४/२०२३ रोजी प्रथम अपिल दाखल केले. सदरचे अपिलाची सुनावणी दि.१८/०५/२०२३ रोजी घेण्यात आली. त्या सुनावणीचे आदेशान्वये संबंधित तक्रारदारास एकूण २५२४ पानांची माहिती दिइ.२६/०५/२०२३ रोजी देण्यात आलेली आहे. सदर तक्रारदाराला प्रथम अपिलाचे आदेशानुसार अपेक्षित माहिती पुरविलेली आहे. तसेच माहिती अर्जाला उत्तर न देण्याचा माझा कुठलाही चुकीचा हेतू व उद्देश नव्हता. भविष्यात माझेकडून कार्यालयीन कामकाज करतांना अशी चूक कधीही होणार नाही याची कटाक्षाने दक्षता घेण्यात येईल व यापुढे प्राप्त होणा-या माहितीच्या अर्जावर तात्काळ कार्यवाही करण्याची दक्षता घेत आहे. तरी महोदयांनी माझा खुलासा मान्य करुन माझेविरुध्द कोणतीही शास्तीची कार्यवाही करु नये ही नम्र विनंती.

४. आयोगाकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, तक्रारदार यांनी दि.०८/०३/२०२३ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहिती दिली नाही म्हणून दि.२७/०४/२०२३ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिलाची प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि), जिल्हा परिषद, नाशिक यांनी

दि.१८/०५/२०२३ रोजी सुनावणी घेवून त्यामध्ये दि.२८/१२/२०२२ रोजी प्रथम अपिल सुनावणी आदेशान्वये अपिलार्थी यांना एका पाकीटमध्ये ९३० पाने व दुस-या पाकीटमध्ये १५९४ पाने प्राप्त झालेबाबत अपिलार्थी यांनी सादर केले आहे. तथापि प्रकल्प स्तरावरील अप्राप्त माहिती बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी वेळेत अपिलार्थी यांना द्यावी व परिपूर्ण माहिती वेळेत न दिलेबाबत बालविकास प्रकल्प अधिकारी यांना नोटीस देवून खुलासा मागविण्यात यावा असे आदेश पारित केल्याचे दिसून येते. त्यानुसार जिल्हा कार्यकारी अधिकारी (मबावि), जिल्हा परिषद, नाशिक यांनी दि.२२/०५/२०२३ व दि.१७/०७/२०२३ च्या पत्रांन्वये बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प, प्रकल्प कार्यालय, सर्व यांचेकडून खुलासा मागविला असल्याचे दिसून येते.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांनी आयोगास सादर केलेला खुलासा व प्रथम अपिल निर्णय विचारात घेता असे दिसून येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांनी तक्रारदार यांना सुमारे २५२४ पानांची माहिती विनामूल्य पुरविलेली असून उर्वरित माहिती बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना, प्रकल्प कार्यालय, सर्व यांनी पुरविलेली दिसून येत नाही. तसेच तक्रारदार यांनी तक्रारीमध्ये असे नमूद केले आहे की, ज्या विभाग व ज्या अधिका-यांविरुध्द कारवाईची मागणी केली आहे त्यांनीच सुनावणी घेतली व दिशाभूल केली. त्यामुळे याप्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद, नाशिक यांना माहिती न देण्यास जबाबदार धरणे उचित होणार नाही. सबब, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद, नाशिक (श्री.संजय सोनवणे) यांनी दि.२५/१२/२०२५ अन्वये आयोगास सादर केलेला खुलासा समर्थनीय असल्यामुळे त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २०(१) नुसार कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद, नाशिक (श्री.संजय सोनवणे) यांनी आयोगास सादर केलेला खुलासा समाधानकारक असल्यामुळे मान्य करण्यात येवून त्यांच्याविरुध्द प्रस्तावित कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) प्रस्तुत तक्रार क्र.४०३/२०२३/नाशिक अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

जा.क्र. 236 , दिनांक :- 08 JAN 2026